महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
पुणे विभागीय मंडळ , पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712
(OFF)

FAX- 020/25536761
Telegram-'SECBOARD' PUNE
E-MAIL pune@msbshse.ac.in

क्रमांक पुविमं/खा.वि./इ.१२वी/ओ-२
पुणे - ४११ ००५
दिनांक - १९.०५.२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर

विषय :- इ.१२वी फेब्रु/मार्च २०१७ करिता खाजगी रितीने परीक्षेस बसू इच्छिणा-या उमेदवारांची नाव नोंदणी आवेदनपत्र (फॉर्म नं.१७) स्विकारण्याच्या कायमस्वरूपी तारखांबाबत...

फेब्रुवारी/मार्च २०१७ च्या इ.१२वी परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून बसू इच्छिणा-या व मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ८९/३ नुसार पात्र असणा-या विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रासह व विहीत शुल्कासह नाव नोंदणी आवेदनपत्रे (फॉर्म नं.१७) संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाकडे सादर करावयाच्या व कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर नाव नोंदणी आवेदनपत्र आवश्यक त्या कागदपत्रासह उदा. इ.१०वी गुणपत्रिका, प्रमाणपत्र व शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी.) यांच्या प्रमाणित केलेल्या छायाप्रतीसह (मूळ कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयाकडे स्वतः कडे ठेवावीत) सादर करावीत. खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ दिनांक १ जून, २०१६ पासून विक्रीकरीता मंडळ कार्यालयात उपलब्ध होतील. फेब्रु-मार्च २०१७ करिता फॉर्म नं.१७ स्विकारण्याच्या कायमस्वरूपी तारखा खालीलप्रमाणे.

| परीक्षा | तपशील | खाजगी विद्यार्थ्यांनी क.महा. कडे फॉर्म नं.१७ सादर करण्याची अंतिम तारीख | शाळा/क.महा.नी नाव नोंदणी शुल्काचे चलन बँकेत भरण्याची अंतिम तारीख | नाव नोंदणी अर्ज फॉर्म नं.१७ बँकेच्या चलनासह मंडळाकडे सादर करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| मार्च | विनाविलंब शुल्कासह | १० जुलै | १३ जुलै | १८ जुलै |
| | विलंब शुल्कासह | २० जुलै | २२ जुलै | २५ जुलै |
| | अतिविलंब शुल्कासह | दिनांक २१जुलै ते २० ऑगस्ट या कालावधीत प्रति दिन प्रति विद्यार्थी रूपये २०/- याप्रमाणे मंडळात कनिष्ठ महाविद्यालय प्रतिनिधी समक्ष ज्या दिनांकास नाव नोंदणी अर्ज क्र. १७ सादर केले जातील त्या दिनांकापर्यंत अतिविलंब शुल्क आकारून नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्विकारले जातील | | |

निर्धारित दिनांकानंतर नाव नोंदणी आवेदनपत्रे (फॉर्म नं.१७) कोणत्याही परिस्थितीत हस्तपोच किंवा पोस्टाने पाठविलेली स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

इ.१२वी परीक्षेसाठी राज्यातील, परराज्यातील व स्थानिक विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ काही कनिष्ठ महाविद्यालय स्विकारत नाहीत व विद्यार्थ्यास समाधानकारक मार्गदर्शन करीत नाही असे निदर्शनास आले आहे. तरी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याची दक्षता घेण्यात यावी. आपल्याकडे येणा-या सर्व विद्यार्थ्यांना सहकार्य करावे. मंडळाकडे कोणाचीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी.

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडे मान्यताप्राप्त असलेल्या शाखा/विषयांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) मंडळाकडे सादर करण्यात याव्यात. मान्यता नसलेल्या शाखांचे/विषयाचे फॉर्म अपात्र करण्यात येईल.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास मान्यता असलेल्या शाखांचे व विषय योजनेप्रमाणे विषयाची निवड विद्यार्थ्यांने केल्याची खात्री करावी चुकीच्या विषयाची/मान्यता नसलेल्या शाखांची /विषयाची निवड विद्यार्थ्यांने नाव नोंदणी केल्याचे निदर्शनास आल्यास सदरहू अर्ज अपात्र करण्यात येईल व त्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपणावर राहिल याची नोंद घ्यावी.

परप्रांत/परदेशातील वा इतर बोर्डातील विद्यार्थ्याचे फॉर्म नं.१७ भरून घेताना त्यांचे योग्यता प्रमाणपत्राचा अर्ज भरून घेणे आवश्यक आहे. मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतल्याशिवाय अशा विद्यार्थ्यांना फॉर्म नं.१७ मध्ये पात्र करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच फॉर्म नं.१७ भरणा-या विद्यार्थ्याकडून भाषा,विषय,तोंडी परीक्षा, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प प्रात्यक्षिक पूर्ण करून घेणे ही कनिष्ठ महाविद्यालयाची जबाबदारी आहे. नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळालेल्या विद्यार्थ्याचे परीक्षेचे आवेदनपत्रे भरून मुदतीत कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे ४११ ००५

प्रत माहितीस्तव
मा.सचिव
राज्य मंडळ,
पुणे-४११००४.

प्रदीप